# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/ 1142

दिनांक : २०.११.२०००

**परिपत्रक - ५१**

वेगवेगळ्या जिल्हयातील क्षेत्रीय अभियंत्यांकडून पाणी पुरवठ्याच्या कामांसाठी जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून वेगवेगळ्या लेखा शीर्षाखाली निधीची तरतूद केली आहे असे संदर्भ या कार्यालयास प्राप्त होतात.

सध्या निधीची कमतरता असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने विविध पातळीवर, पाणी पुरवठ्याची कामे हाती घेण्यावर निर्बंध घातले आहेत. त्यापैकी सद्यः कोणत्याही कामाच्या निविदा बोलावू नयेत असाही शासनाचा आदेश प्रचलित आहे.

निविदा न बोलावण्याच्या धोरणामुळे अगदी थोडक्या रकमेची कामेही हाती घेता येत नाहीत व त्यामुळे योजनेची बहुतांश पूर्ण झालेली कामे उपयोगात आणता येत नाहीत.

वरील बाबींचा विचार करुन सदस्य सचिव (प्रशासन) यांनी नागपूर येथे दिनांक १६.९.२००० रोजी झालेल्या बैठकीत असे आदेश दिले आहेत की, जिल्हा नियोजन व विकास मंडळाने पाणी पुरवठ्याच्या वेगवेगळ्या कार्यक्रमांतर्गत असलेल्या कामांसाठी उदा.वर्धित वेग कार्यक्रम, किमान गरजा कार्यक्रम, आदिवासी उप विभाग इत्यादि तरतूद केली असेल व ती शासनाने मान्य करुन त्यानुसार निधी उपलब्ध करुन दिला असेल तर त्या तरतुदींमध्ये बसतील एवढया रकमेची व त्यांचा योजना लगेच कार्यवाहीत आणण्यास उपयोग होईल अशी कामे निविदा काढून हाती घ्यावीत. त्यासाठी वेगळ्या परवानगीची आवश्यकता रहाणार नाही. याबाबत लेखा शाखेस वेळोवेळी संबंधीत माहिती कळविण्यात यावी.

(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत,

प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

**प्रत,**

सदस्य सचिव (प्रशासन) यांना माहितीस्तव.

**सोबत :** नाही.

विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, सिडको भवन यांना माहितीसाठी.

**सोबत :** नाही.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा. (सर्व) यांना माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.

**सोबत :** नाही.

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

**सोबत :** नाही.

अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ (सर्व) यांना माहितीसाठी.

**सोबत :** नाही.

कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. विभाग (सर्व) यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

**सोबत :** नाही.

जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

**सोबत :** नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

नस्ती बंद.